अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 30 जुलै 2026 | वर्ष 11 वे | अंक 51 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## जीवघेणा प्रवास आणि अनधिकृत टोलविरोधात जनता आक्रमक

### केसीसी कंत्राटदारावर कारवाई करा व मार्ग दुरूस्तीपर्यंत टोल वसुली थांबविण्याची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी ते नागभीड राज्यमार्गावर सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या अत्यंत संथ आणि बेजबाबदार कामामुळे सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अत्यंत धोकादायक बनला आहे. पावसाळ्यात वळण रस्त्याची (डायव्हर्शन) झालेली दुरावस्था, चिखलमय रस्ता आणि खड्डयांमुळे दररोज नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रवाशांच्या हितासाठी नगरपरिषद




सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (ओबीसी विभाग) चंद्रपूर जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष अविनाश आ. राऊत यांच्या नेतृत्वात मा. तहसीलदार, ब्रम्हपुरी यांना मंगळवारी निवेदन देण्यात आले.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केसीसी (KCC) ग्रुपकडून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू आहे. नियमानुसार कोणत्याही मुख्य रस्त्याचे बांधकाम सुरू असताना प्रवाशांच्या दळणवळणासाठी सुयोग्य, सुरक्षित व पक्का वळण रस्ता (सर्व्हिस रोड) तयार करून देणे ही कंत्राटदाराची प्राथमिक जबाबदारी असते. कंत्राटदाराला दिलेल्या कामाच्या आदेशात (वर्क ऑर्डरमध्ये) या वळण रस्त्याच्या कामाचे स्पष्ट मूल्यांकन आणि निधी समाविष्ट असतो. असे असतानाही केसीसी कंत्राटदाराने सर्व्हिस रोडची अत्यंत दुरावस्था करून ठेवली आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून दररोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. कंत्राटदाराचा हा निष्काळजीपणा आणि जनतेच्या जीवाशी चालवलेला खेळ अतिशय निंदनीय व संतापजनक असल्याची तीव्र भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

एकीकडे प्रवाशांना सुरक्षित रस्ता उपलब्ध करून दिला जात नाही, तर दुसरीकडे खरबी नाक्यावर जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांकडून सक्तीने टोल वसूल केला जात आहे. 'खराब आणि धोकादायक रस्त्यावरून प्रवास करायचा आणि वरून टोलही भरायचा?' असा सवाल

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## वीज वितरणात खासगी कंपन्यांच्या प्रवेशाने महावितरणला झटका

### ग्राहकांना आता आवडीचा वीज पुरवठादार निवडता येणार

ब्रह्मपुरी /प्रतिनिधी :

देशभरातील वीज ग्राहकांना अधिक चांगली सेवा मिळावी आणि वीज वितरण क्षेत्रात निकोप स्पर्धा निर्माण व्हावी, यासाठी केंद्र सरकार नवीन वीजदुरुस्ती विधेयकात एक अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी बदल करण्याच्या तयारीत आहे. या नव्या दुरुस्तीनुसार, एकाच भागात वीज वितरणासाठी नवीन कंपन्यांना आता स्वत:चे स्वतंत्र वितरण जाळे (खांब, तारा आणि उपकेंद्र) उभारण्याची सक्ती असणार नाही. ही अट रद्द केल्यामुळे एकाच शहरात किंवा भागात एकापेक्षा जास्त कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या निर्णयामुळे भविष्यात मोबाईल नेटवर्क कंपनी निवडण्याप्रमाणेच ग्राहकांना आपल्या आवडीचा आणि स्वस्त वीज पुरवठादार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळणार आहे.

सध्याच्या नियमांनुसार एका भागात दुसऱ्या कंपनीला वीज पुरवठा करायचा असल्यास त्यांना स्वत:चे वेगळे खांब आणि तारांचे जाळे उभारावे लागत होते. त्यामुळे



प्रचंड खर्च आणि जागेची अडचण यामुळे समांतर वीजपुरवठा शक्य होत नव्हता. आता मात्र एकाच कंपनीच्या जाळ्याचा वापर करून इतर कंपन्यांनाही वीज विकता येईल. मूळ वीज जाळे ज्या कंपनीचे आहे, तिचा वापर करणाऱ्या इतर नव्या कंपन्यांना त्यासाठी ठराविक 'वहन आकार' द्यावा लागेल. हा आकार ठरवण्याचे आणि वितरण जाळ्याच्या नियमनाचे सर्व अधिकार 'राज्य वीज नियामक आयोगाकडे' (MERC/ERC) असणार आहेत. नियामक आयोगाने परवानगी दिल्यास, नवीन परवानाधारक कंपन्यांना वाटल्यास स्वत:चे स्वतंत्र जाळे विकसित करण्याची मुभा देखील यात देण्यात आली आहे.

सध्याच्या घडीला संपूर्ण देशात केवळ मुंबईमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बेस्ट (BEST), अदानी इलेक्ट्रिसिटी, टाटा पॉवर आणि महावितरण या कंपन्या एकाच वितरण जाळ्याचा वापर करून आपापल्या ग्राहकांना वीजपुरवठा करतात. मुंबईत यशस्वी ठरलेला हाच 'समांतर वीजपुरवठा' प्रयोग आता नव्या कायद्याद्वारे देशभरात राबवला जाणार असल्याचे केंद्रीय ऊर्जामंत्र्यांनी नुकत्याच झालेल्या ऊर्जा खात्याच्या आढावा बैठकीत स्पष्ट केले. मुंबई वगळता संपूर्ण महाराष्ट्रात सध्या 'महावितरण'ची (MSEDCL) एकछत्री अंमलबजावणी आणि मक्तेदारी आहे. मात्र, नव्या निर्णयामुळे राज्यातील चित्र पूर्णपणे बदलणार आहे. अदानी, टाटा आणि टोरेंट यांसारख्या बलाढ्य खाजगी कंपन्यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि महावितरणच्या इतर भागांत समांतर वीज वितरणाच्या परवान्यांसाठी आधीच अर्ज केले आहेत. स्वतंत्र जाळ्याची अट हटल्याने या कंपन्यांना परवाने मिळणे सुलभ होईल. दुसरीकडे, महावितरणनेही मुंबईतील टाटा, अदानी आणि बेस्टच्या अधिकार क्षेत्रात वीज वितरणासाठी परवानगी मागितली आहे.

खाजगी आणि सरकारी कंपन्यांमध्ये स्पर्धा सुरू झाल्यामुळे ग्राहकांना अखंडित, गुणवत्तापूर्ण वीज आणि अधिक उत्तम ग्राहक सेवा मिळेल. तसेच, स्पर्धा वाढल्याने विजेचे दरही नियंत्रणात राहण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आयोग लवकरच यासाठी आराखडा तयार करणार आहे.



## संपादकीय...

# इंधनातील भेसळीचा मुद्दा

इथेनॉल मिश्रणामुळे आयात होणाऱ्या कच्च्या तेलावरील खर्च कमी होईल, पर्यावरणाला लाभ होईल आणि देशाच्या ऊर्जा सुरक्षेला बळ मिळेल, असे सरकारचे म्हणणे आहे. दुसरीकडे, आंदोलनकर्त्यांचा दावा असा आहे की ई-२० मुळे मायलेज घटते, इंजिनची कार्यक्षमता कमी होते, देखभाल खर्च वाढतो आणि विशेषत: जुन्या वाहनांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. सरकारकडे अशा स्वरूपाच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी नसल्याचा दावा केला जात असला, तरी केवळ तक्रारीचा अभाव म्हणजे समस्या अस्तित्वात नाही, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. सार्वजनिक धोरणांबाबत विश्वास टिकवायचा असेल, तर सरकारने आकडेवारीसोबतच पारदर्शक संवादही साधला पाहिजे.

या आंदोलनाचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'पर्यायाचा हक्क'. आंदोलनकर्त्यांनी इथेनॉल मिश्रणाला विरोध नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांची मागणी एवढीच आहे की, ग्राहकाला ई-२० बरोबरच १०० टक्के शुद्ध पेट्रोल खरेदी करण्याचाही पर्याय उपलब्ध असावा. बाजारपेठेतील स्पर्धेच्या आणि ग्राहक हक्कांच्या दृष्टीने ही मागणी विचार करण्यासारखी आहे. आज इथेनॉलमुक्त पेट्रोल केवळ प्रीमियम स्वरूपात, अत्यंत मर्यादित ठिकाणी आणि जास्त दराने उपलब्ध आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकाला प्रत्यक्षात कोणताही पर्याय उरत नाही. राष्ट्रीय धोरण राबविताना ग्राहकांच्या निवडीचे स्वातंत्र्य पूर्णपणे नाहीसे होता कामा नये. भारताने इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पर्यायी बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि कार्बन उत्सर्जनात घट घडवून आणणे या उद्देशाने इथेनॉल मिश्रित पेट्रोलचे धोरण स्वीकारले. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण (ई-२०) हे त्याच धोरणाचे पुढचे पाऊल आहे. धोरणाचा उद्देश व्यापक राष्ट्रीय हिताचा असला, तरी त्याच्या अंमलबजावणीबाबत निर्माण होणारे प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाहीत. दिल्लीतील टॅक्सी आणि पर्यटन वाहतूक व्यावसायिकांनी ई-२० विरोधात संसदेकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर सोशल मीडियावर उभ्या राहिलेल्या 'ई-२० जनता पार्टी'सारख्या मोहिमांनी या प्रश्नाला केवळ तांत्रिक नव्हे, तर सार्वजनिक विश्वासाचा मुद्दा बनवले आहे.

याचबरोबर वाहन उत्पादकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. २०१५ पूर्वीची अनेक वाहने ई-२० साठी डिझाइन केलेली नव्हती, असा दावा केला जात आहे. जर त्यात तथ्य असेल, तर अशा वाहनधारकांना योग्य मार्गदर्शन, तांत्रिक उपाय किंवा संक्रमणकालीन व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अन्यथा सार्वजनिक धोरणाचा आर्थिक भार थेट नागरिकांवर पडण्याची भीती निर्माण होते. वाहन उत्पादक, इंधन कंपन्या आणि सरकार यांनी संयुक्तपणे याविषयी स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे.

या आंदोलनातून आणखी एक बाब अधोरेखित होते.

ई-२० विरोधातील मागण्यांसोबत स्क्रॅपेज धोरण, बीएस-४ वाहनांवरील निर्बंध, टोल दर, पर्यटन वाहनांवरील वेगमर्यादा आणि ट्रॅकिंग उपकरणांची सक्ती असे अनेक मुद्दे जोडले गेले आहेत. म्हणजेच हा केवळ इथेनॉलचा प्रश्न राहिलेला नाही; वाहतूक क्षेत्रातील वाढत्या नियमनाविषयीचा असंतोष त्यामागे दडलेला आहे. जेव्हा विविध प्रश्न एकाच व्यासपीठावर येतात, तेव्हा सरकारने त्याकडे केवळ आंदोलन म्हणून नव्हे, तर धोरणात्मक अभिप्राय म्हणून पाहिले पाहिजे. डिजिटल माध्यमांवर व्यक्त होणारी प्रत्येक भूमिका वस्तुनिष्ठ असेलच असे नाही; पण त्या माध्यमातून व्यक्त होणारा अविश्वास दुर्लक्षित करणेही योग्य ठरणार नाही.

राष्ट्रीय ऊर्जा धोरणात इथेनॉलचे स्थान महत्त्वाचे आहे. हवामान बदल, इंधन आयात आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न या तिन्ही प्रश्नांची उत्तरे शोधताना इथेनॉल हा एक पर्याय म्हणून आवश्यकच आहे. मात्र कोणतेही धोरण यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारी अधिसूचना पुरेशी नसते; त्यासाठी नागरिकांचा विश्वास, पारदर्शक माहिती आणि वैज्ञानिक पुराव्यावर आधारित संवाद आवश्यक असतो. सरकारने स्वतंत्र तांत्रिक अभ्यास, खुली जनसुनावणी आणि आवश्यक तेथे पर्याय उपलब्ध करून देण्याचा विचार केला, तर वादाचा सूर कमी होऊ शकतो.

# महावितरणच्या विरोधात भाकपचे धरणे व निदर्शने

## विजेचे स्मार्ट मिटर, दरवाढ व खाजगीकरणाविरोधात कार्यकारी अभियंता यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्यव्यापी आवाहनानुसार विजेचे स्मार्ट




मीटर, खाजगीकरण, वीज दरवाढ इत्यादींच्या विरोधात दिनांक २७ जुलै २०२६ ला वीज वितरण कंपनी विभागीय कार्यालय ब्रम्हपुरी येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांच्या नेतृत्वात अवघडे कार्यकारी अभियंता व बोबाटे मॅडम नायब तहसील यांना निवेदन देऊन स्मार्ट मीटर हटवा, वाढते वीज बिल थांबवा यासह अन्य मागण्या करण्यात आल्या.

ब्रम्हपुरी शहरातील तसेच ग्रामीण भागात गुपचुप व जबरदस्तीने लावलेले स्मार्ट मिटर तातडीने काढून घ्या व पूर्वीचे जुने मिटर तात्काळ लावा. लोकांची परवानगी नसतांना चलाखी करुन, गुपचुप तसेच अनेकांचे फॉल्टी मिटर नसतांना फॉल्टी मिटरच्या नावाखाली जुने मिटर घेवून जायचे आणि स्मार्ट मिटर लावायचे तसेच नविन कनेक्शन देत असतांनाही जबरदस्तीने जुन्या पध्दतीचे मिटर नाहीत असे सांगुन स्मार्ट मिटरच घ्यावे लागेल अशी हुकुमशाही, जबरदस्ती करुन स्मार्ट मिटर जनतेला लुटण्यासाठी लावायचे हा प्रकार थांबला पाहीजे व ज्या ठिकाणी अशा पध्दतीने स्मार्ट मिटर लावले आहेत ते तातडीने काढुन घेतले पाहीजे. सरकारी कार्यालये व सरकारी निवासस्थानावर लावलेले स्मार्ट मिटरही तातडीने काढुन घेतले पाहीजे, टीओडी पध्दतीची वीज नियामक आयोगांनी केस नंबर २१७/२०२४ अंतर्गत मंजूर केलेली छुपी व प्रचंड प्रमाणातील वीज दरवाढ कायमची रद्द करा, एप्रिल २०२४ च्या वीजदरापेक्षाही कमी वीज दर करा, अन्याय करणारी भेदभावपूर्ण लोड शेडींग बंद करा, सिक्युरिटी डिपॉझिट च्या नावाने करत असलेली लूट बंद करा, स्मार्ट मीटरचे कंत्राट बंद करा, वीजेचे खाजगीकरण रद्द करा इत्यादी मागण्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात कुठे स्मार्ट मीटरची होळी, कुठे मोर्चे या पद्धतीने विरोध प्रदर्शन सुरू आहेत त्या अनुषंगाने भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्वात ब्रम्हपुरी येथे २९ जुलैला कॉम्रेड विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन पार पडले. यावेळी बहुसंख्य नागरिक व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# वृक्ष वारीतून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश

## जि.प.शाळा हळदाचाउपक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आषाढी एकादशीच्या निमित्ताने



निघणाऱ्या पायी वारीची प्रेरणा घेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, हळदा येथे विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'वृक्ष वारी' या अभिनव उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ, मृदंग आणि भगव्या पताका हातात घेत गावातून दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या हातात विविध वृक्षांची रोपे असून 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा', 'पर्यावरणाचा समतोल राखा', 'झाडे आहेत जीवनाचा आधार' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या अनोख्या वृक्ष वारीने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. या वृक्ष वारीत गावातील गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते देखील उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

रॅली शाळेत परतल्यानंतर सर्वांनी सामूहिक हरिपाठ करून कार्यक्रमाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. या अभिनव उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच वारकरी परंपरेतील श्रद्धा, संस्कार आणि निसर्गप्रेम यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. ग्रामस्थांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत शाळेच्या पर्यावरणपूरक उपक्रमांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता रासेकर, अशोक नागोसे, रेखा ढोरे, विनोद मदनकर, अनंत भोयर, सुषमा ठेंगरे, रजनी सलामी, वैशाली नारलावार, स्वाती नागपुरे, सुशिकला चांदेवार, संदीप राऊत यांनी मार्गदर्शन केले.

## विनोदिनी

गणितात ''ढ'' असणाऱ्या बंड्याला १०० पैकी ९० गुण मिळाले...

मॅडम : बंड्या तुला ९० गुण देतांना मला खूप आनंद होतोय.... असाच अभ्यास नेहमी करत जा...

बंड्या : मॅडम... तुम्ही तुमचा आनंद द्विगुणित करू शकता...

मॅडम : ते कसं काय...??

बंड्या : मॅडम... पूर्ण १०० गुण देऊन...!!!

# मोकाट जनावरांच्या थेट लिलावाचा नगर परिषद ब्रम्हपुरीचा पशूपालकांना इशारा

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील मुख्य रस्ते, वर्दळीचे चौक आणि सार्वजनिक ठिकाणी बिनदिक्कत फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे अपघातांची मालिका आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या समस्येची गंभीर दखल घेत नगर परिषद ब्रह्मपुरी प्रशासनाने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, शहरातील मोकाट जनावरांविरुद्ध विशेष धडक मोहीम हाती घेतली आहे.


(संग्रहित छायाचित्र)

गेल्या काही दिवसांपासून ब्रह्मपुरी शहरातील प्रमुख रस्त्यांवर आणि चौकांमध्ये गायी, बैल व इतर जनावरे ठाण मांडून बसलेली दिसतात. यामुळे केवळ वाहतुकीला अडथळा निर्माण होत नसून अनेकदा गंभीर अपघात घडले आहेत. नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस निर्माण झालेला हा धोका टाळण्यासाठी प्रशासनाने थेट कारवाईचा बडगा उगारण्याचे निश्चित केले आहे. नगर परिषदेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, या विशेष मोहिमेदरम्यान रस्त्यांवर व सार्वजनिक ठिकाणी आढळणारी सर्व मोकाट जनावरे 'बेवारस' समजून नगर परिषदेमार्फत ताब्यात घेतली जातील. त्यानंतर महाराष्ट्र नगर परिषद कायद्यातील नियमांनुसार पुढील कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, आवश्यकतेनुसार अशा जनावरांचा थेट लिलाव करण्याची कार्यवाही देखील केली जाणार आहे.

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेने पशुपालकांना कठोर इशारा दिला आहे. सर्व जनावरांच्या मालकांनी आपली गायी, बैल व इतर जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत. त्यांची स्वत:च्या जागेत किंवा सुरक्षित ठिकाणी योग्य व्यवस्था करावी. या आवाहनानंतरही जनावरे रस्त्यावर मोकाट आढळल्यास, होणाऱ्या सर्व कायदेशीर व आर्थिक नुकसानीस संबंधित मालकच पूर्णपणे जबाबदार राहतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी आणि नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत आवश्यक आहे. पशुपालकांनी आपली जबाबदारी ओळखून जनावरे रस्त्यावर सोडू नयेत आणि सर्व नागरिकांनी नगर परिषदेच्या या मोहिमेला पूर्ण सहकार्य करावे.** – डॉ. माधुरी सलामे (मुख्याधिकारी, न.प. ब्रह्मपुरी)

# ने.हि. महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती साजरी



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी व अधीक्षक संगीता ठाकरे यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ युवराज मेश्राम, डॉ योगेश ठावरी, प्रा जयेश हजारे, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ विवेक नागभीडकर, डॉ अतुल येरपुडे, प्रा निलिमा रंगारी, डॉ मिलिंद पठाडे, प्रा धिरज आतला, डॉ ज्योती दुपारे, प्रा.अन्सारी, प्रा ऋतुकी बोरकर, रोशन डांगे, घनश्याम नागापूरे, सुषमा राऊत इत्यादी मान्यवरांनी फोटोला पुष्प वाहून आपली आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्राम यांनी केले तर यशस्वीतेसाठी डॉ खानोरकर, प्रा आतला, गोलू कोसे, प्रदीप रामटेके यांनी सहकार्य केले.

# अऱ्हेर नवरगांव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे लोकार्पण

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील अऱ्हेर नवरगांव येथील सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, मेश्राम माजी सभापती, उमाजी कुथे, डॉ सहारे, डॉ मनाली फटिंग पी एच सी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. दरम्यान, वंदना



आरोग्य विभाग जिल्हा परिषद, चंद्रपूर आयुष्यमान आरोग्य मंदिर आरोग्य परम् धनम् – प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारत लोकार्पण सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. या सोहळ्याचे उद्घाटन डॉ. सतीश वारजूरकर यांनी कृष्णा सहारे माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद, चंद्रपुर यांच्या अध्यक्षतेखाली फीत कापून केले.

प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून क्षीरसागर मॅडम मुख्य कार्यपालन अधिकारी, चंद्रपुर , डॉ अशोक कटारे जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपुर, दीनदयाल मटाले कार्यकारी अभियंता चंद्रपुर, तुषार दांडगे बिडीओ पंचायत समिती ब्रह्मपुरी, शेळके मॅडम, दोनाडकर, विलास ऊरकुडे, सुरेश दुनेदार सरपंच , बांडे सरपंच नांदगाव जाणी, नागोराव पिलारे हरदोली, श्रीकांत पिलारे, रवी मेश्राम ,नयना क-हाडे, जोस्त्ना ठोंबरे, शितल दिघोरे या आशा वर्कर नी एस पी व्ही इंजेक्शनची जनजागृती करण्या संबंधाने केलेले पथनाट्य लोकार्पण सोहळ्याचा केंद्रबिंदू ठरला. सर्व उपस्थितांनी मन भरून या पथनाट्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमाकरिता ब्रह्मपुरी तालुक्याच्या मुडझा, आवळगांव या शेवटच्या टोकापासूनचे आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अऱ्हेरनवरगांव आरोग्य केंद्रातील जवळपास पंधरा गावातील आरोग्य कर्मचारी, परिचारिका, आशा वर्कर यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ सुखदेवे मॅम यांनी केले.

# माजी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याच्या मुलींचा दुहेरी विश्वविक्रम

## इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड व वंडर किड्स रेकॉर्डमध्ये नोंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथे वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून कार्यरत




राहिलेल्या अधिकाऱ्याच्या दोन कन्यांनी आपल्या अनोख्या कौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर दुहेरी विक्रम नोंदवत ब्रम्हपुरीचेही नाव उज्ज्वल केले आहे. नागपूर येथील श्राविका स्वप्नील बागडे (वय १०) आणि तिची धाकटी बहीण अन्विका स्वप्नील बागडे (वय ६) यांनी डोळ्यांवर पट्टी बांधून विविध वस्तू अचूक ओळखण्याच्या कौशल्यातून इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड तसेच वंडर किड्स रेकॉर्डमध्ये आपली नोंद केली आहे.

श्राविका व अन्विका यांच्या आई पुनम बामणे-बागडे ह्या यापूर्वी ब्रम्हपुरी येथे वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. नागपूर येथील 'थर्ड आय' संस्थेमार्फत विशेष प्रशिक्षण घेतल्यानंतर दोन्ही बहिणींनी डोळ्यांवर पट्टी बांधून विविध वस्तू, रंग तसेच चलनी नोटांवरील क्रमांक अचूक ओळखण्याचे कौशल्य सादर केले. श्राविका बागडे हिने अवघ्या ४६ सेकंदांत २५ स्वातंत्र्यसैनिकांची छायाचित्रे अचूक ओळखून विक्रम प्रस्थापित केला. तर अन्विका बागडे हिने ५८ सेकंदांत ७ रंग, १८ कपांवरील चिन्हे आणि ७ चलनी नोटांवरील क्रमांक अचूक ओळखून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या दोघींच्या यशामागे त्यांचे आजोबा जगन्नाथ बागडे (वय ८२) यांचे मार्गदर्शन आणि 'थर्ड आय' संस्थेच्या प्रशिक्षिका किरण काकडे यांचे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले आहे. या उल्लेखनीय यशाची दखल घेत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दोन्ही चिमुकल्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# माजी आमदार प्रा. देशकर यांचा वाढदिवस ठरला जनसेवेचा सोहळा

## ६८ दिव्यांनी औक्षण, शेकडो रुग्णांची मोफत तपासणी, गरजूंवर मोफत शस्त्रक्रिया

ब्रम्हपुरी/का.प्र.

जनसेवेलाच आपल्या आयुष्याचे सर्वोच्च ध्येय मानणारे, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षाच्या वतीने सोमवारी विठ्ठल-रुक्मिणी सभागृह, ब्रम्हपुरी येथे भव्य 'रोगनिदान व रक्तदान शिबिर' अत्यंत उत्साहात पार पडले. आपल्या लाडक्या नेत्याचा वाढदिवस केवळ शुभेच्छांचा वर्षाव न ठरता सामाजिक बांधिलकी जपणारा महाआरोग्य सोहळा ठरल्याने, सर्वसामान्य नागरिकांसह कार्यकर्त्यांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रा. अतुल देशकर यांच्या जनहितैषी आणि तळागाळातील घटकांपर्यंत



पोहोचण्याच्या वृत्तीला साजेसे असेच या शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. शिबिरात हृदयरोग, कर्करोग, स्त्रीरोग, अस्थिरोग, शल्यचिकित्सा, नेत्ररोग यांसारख्या विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व निदान करण्यात आले. केवळ तपासणीवरच न थांबता, ज्या रुग्णांना पुढील शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, अशा रुग्णांवर कामठी (नागपूर) येथील प्रसिद्ध 'आशा हॉस्पिटल'मध्ये संपूर्ण निशुल्क शस्त्रक्रिया केली जाणार आहे. तसेच नेत्रतपासणी दरम्यान आढळलेल्या मोतीबिंदू, काचबिंदू व डोळ्यांच्या अन्य गंभीर आजारांवर नागपूर येथील प्रतिष्ठित रुग्णालयात मोफत उपचार व शस्त्रक्रियांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे अनेक गरीब व गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आपल्या लोकनेत्याविषयी वाटणारा सार्थ अभिमान व आपुलकी व्यक्त करत भाजप महिला आघाडीच्या वतीने प्रा. अतुल देशकर यांचे ६८ दिव्यांनी औक्षण करण्यात आले. यानंतर उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात आणि उत्साही वातावरणात केक कापून त्यांच्या उदंड आणि निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

या स्नेहमयी प्रसंगी प्रा. देशकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश वारजुकर, ज्येष्ठ भाजप नेते दीपक उराडे, ज्येष्ठ भाजप नेते प्रा. प्रकाश बगमारे, भाजप शहराध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे, भाजप जिल्हा सचिव इंजि. अरविंद नंदुरकर, माजी तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे आणि भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष वंदना शेंडे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा जनसेवेचा यज्ञ यशस्वी करण्यासाठी आशा हॉस्पिटल (कामठी, नागपूर), डॉ. हेडगेवार रक्तपेढी (ब्रम्हपुरी) आणि ग्रामीण रुग्णालय (ब्रम्हपुरी) यांच्या वैद्यकीय टीमचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट व नियोजनबद्ध आयोजनासाठी प्रा. डॉ. सुयोग बाळबुध्दे, तनय देशकर, ज्ञानेश्वर दिवटे, मनोज भूपाल, साकेत भानारकर यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. अतुल देशकर यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेला हा उपक्रम ब्रम्हपुरी आणि परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

## ग्राम स्वच्छता अभियानच्या विभागस्तरीय समितीची वांद्रा ग्रा.पं.ला भेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

पं.स. ब्रम्हपुरी अंतर्गत ग्रा.पं. वांद्रा येथे संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची नागपुर विभाग स्तरीय तपासणी समितीने दिनांक २३ जुलै २०२६ ला भेट देऊन पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, घर गांव परिसर स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि लोकसहभाग आणि वैयक्तिक व सामुहिक पुढाकारातून विकासासाठी राबविण्यात आलेले नाविण्यपुर्ण उपक्रमाबाबत ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी, वृक्षलागवड, क्रिडांगण, व गावातील मंदिरे व धार्मिक स्थळांची पाहणी केली.

यावेळी विवेकजी ईलमे साहेब, आयुक्त नागपुर विभाग नागपुर यांनी समितीचे नेतृत्व केले. त्याचे सोबत कमल किशोर फुटाणे , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.पं. नागपुर तसेच छत्रपालजी पटेल, सहाय्यक गट विकास अधिकारी, जि.प. नागपुर हे उपस्थित होते. जि.पं. चंद्रपूर येथील मच्छींद्रनाथ धस साहेब, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्वच्छता) व प्रकाशजी उमक जिल्हा समन्वयक स्व.भा.मिशन हे उपस्थित होते. सोबत पं.स.ब्रम्हपुरीचे गट विकास अधिकारी तुषारजी दांडगे व सहाय्यक गट विकास अधिकारी सुरेश राठोड, बाल विकास प्रकल्प अधिकारी, श्रीमती विद्या शेडके, गट शिक्षणाधिकारी मिलिंद कुरसुंगे, अशोक शामकुळे विस्तार अधिकारी (पंचायत), महादेवजी मडावी प्रशासक, गुरुदेवजी वाघरे प्रशासकीय समिती सदस्य व ऋषीश्वर औरासे ग्रामपंचायत अधिकारी व विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामपंचायताने राबविलेले विविध उपक्रम बघुन समितीने समाधान व्यक्त केले व पुढील कामांसाठी शुभेच्छा दिल्या.

## हिंदू ज्ञान मंदिरात राष्ट्रीय ध्वज दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील हिंदू ज्ञानमंदिर ब्रह्मपुरी येथे दिनांक २२/०७/२०२६ बुधवारला राष्ट्रीय ध्वज दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

1st to 8th च्या विद्यार्थ्यांनी ध्वज दिनावर आधारित चित्रकला स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त भाग घेतला व 9th व 10th च्या विद्यार्थ्यांनी ध्वज दिनावर सुंदर माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका कु.अंजुम सय्यद मॅडम, हर्षा आबदेव मॅडम, काळे मॅडम, ऐतिहासिक दिवसाविषयी सविस्तर माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान, व राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व समजून घेतले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन शरयू भानारकर मॅडम यांनी केले.

## लोकमान्य टिळकांची जयंती साजरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

गुरूवार दि. २३ जुलै रोजी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची १७० व्या जयंतीचे आयोजन करण्यात आले.

या वेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे, एन.एस.एस.अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, प्रा.डॉ.सुहास साकरकर, प्रा. डॉ.अनुप बारसागडे, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.छगन डोईजड, प्रा. भूपेश भेंडारकर, प्रा.चेतन चौधरी, प्रा.पूजा घुटके, प्रा. सविता वसाके, प्रा. विजया सोनवणे, प्रा.प्राची मांडवे, प्रा.अमिषा जयस्वाल, प्रा.राकेश तरारे, प्रा. प्रसंजित लांडगे, प्रा.खुशबू कापगते, प्रा.पायल नागोसे, आशिष गजपुरे आणि सकलेन पठाण आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षक आणि विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## मुख्याध्यापक गोवर्धन सराय यांना राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शेगाव येथे दिला जाणारा या वर्षांचा प्रतिष्ठित राज्यस्तरीय 'कर्तव्यदक्ष पुरस्कार' आपल्या शैक्षणीक कार्याबरोबरच, आपले जीवन इतर गरीब, पिडीत, गोरगरीब लोकांसाठी कामी यावे, यासाठी रक्तदान, अंधश्रद्धा, व्यसनमुक्तीचे कार्य करणारे, शिक्षक कॉलनी ब्रम्हपुरी येथील रहिवासी व जिल्हा परिषद शाळा कोसंबी गवळीचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते गोवर्धन रतीराम सारये यांना प्रदान करण्यात आला आहे.

मुख्याध्यापक गोवर्धन सारये त्यांनी आज पर्यंत ५४ वेळा रक्तदान करून बऱ्याच लोकांना जीवनदान दिले आहे.

राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार सोहळ्याच्या आयोजन कार्यक्रमात मुख्य आयोजक प्रतीक्षा वासनिक (इंगळे), संकल्प बहुदेशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र इंगळे, ग्रामीण युवा बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सतिश हातोले व अन्य मान्यवर यांच्या उपस्थित मुख्याध्यापक गोवर्धन रतीराम गोवर्धन यांना राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# कारगिल विजय दिनानिमित्त ब्रम्हपुरीत कॅन्डल मार्च

## नीट पेपर लिक प्रकरणातील आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांना श्रध्दांजली



ब्रम्हपुरी/का.प्र.

नीट पेपर लीक प्रकरणामुळे नैराश्यातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसेच कारगिल विजय दिनानिमित्त भारतीय सेनेच्या अद्वितीय शौर्याला सलाम आणि शहीद जवानांच्या पवित्र बलिदानाला शतशः नमन करण्यासाठी ब्रम्हपुरी येथे कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ, भीमनगर येथून कॅन्डल मार्चला प्रारंभ झाला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत हा मार्च काढण्यात आला. यावेळी उपस्थितांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून नीट प्रकरणातील दिवंगत विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली, तसेच कारगिल युद्धातील शहीद जवानांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमुरकर, जगदिश उर्फ मोंटू पिलारे नगरसेवक न.प.ब्रम्हपुरी, वकार खान नगरसेवक न.प.ब्रम्हपुरी, नरेंद्र गाडगिलवार, सुरज मेश्राम, गौरव भेंडारकर, दिपक मेहेर, अतुल राऊत यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण केली व कारगिलच्या वीर जवानांच्या शौर्यपूर्ण बलिदानाला विनम्र अभिवादन केले.

# प्रा. दलेश परशूरामकर यांना भौतिकशास्त्रात आचार्य पदवी



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रा. दलेश परशुरामकर यांनी नुकतीच गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील आचार्य पदवी प्राप्त केली. त्यांनी आपला ‘डेव्हलपमेंट ऑफ सम लॅथेनाईडस ॲक्टिवेटेड इनऑरगॅनिक फॉस्फर्स फॉर इनव्हरोमेंट फ्रेंडली सॉलिड स्टेट लाइटीनिंग अँपलीकेशन’ या विषयाचा प्रबंध मार्गदर्शक डॉ.अतुल येरपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाला सादर केला होता.

आचार्य पदवी मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताबाई भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर, माजी प्राचार्य डॉ डी.एच. गहाणे, डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ अरविंद मुंगोले, डॉ मोहन कापगते, डॉ अभिमन्यू पवार समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व मित्रमंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# तालुका क्रिडा संकुलात न.प.द्वारे वृक्षारोपण संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी नगर परिषदेच्या वतीने तालुका क्रीडा संकुल ब्रम्हपुरी येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात कार्यालयातील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली.

यावेळी उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारत लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच भावी पिढ्यांना स्वच्छ व हरित परिसर उपलब्ध करून देण्यासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमास नगर परिषद अध्यक्ष योगेश मिसार, उपाध्यक्ष नितीन उराडे, मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे, नगरसेवक मनोज कावळे, राकेश पडोळे, मनोज भूपाळ, मोंटू पिलारे, पुष्पकर बांगरे, वकार खान, नगरसेविका जयश्री कुथे, सपना बल्लापुरे, माधुरी उपासे, काजल तलमले, पुष्पलता पोपटे, गीता मेश्राम, लेखापाल नकुल भाजीपाले, कर निर्धारक ईश्वर बिच्चेवार, प्रकल्प अधिकारी धनंजय पोटे, बचत गटातील महिला, शैला सिंहगड व कर्मचारी उपस्थित होते.

# विशाल सोनकुसरे यांना डॉक्टरेट पदवी प्रदान



नागभीड/प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील युवा संशोधक डॉ. विशाल दिवाकर सोनकुसरे यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत ४ उच्च प्रभाव (High Impact) आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. तसेच त्यांनी ४ आंतरराष्ट्रीय आणि १ राष्ट्रीय परिषदेत आपले संशोधन सादर केले असून १ पुस्तक प्रकरण देखील प्रकाशित केले आहे. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेत २०२५ मध्ये पोर्तुगालमधील लिस्बन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी भारत सरकारकडून International Travel Support Award त्यांना प्रदान करण्यात आला होता. ही उपलब्धी त्यांच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता अधोरेखित करणारी आहे.

डॉ. विशाल सोनकुसरे यांना दि. २५ जुलै रोजी NIT तिरुचिरापल्ली येथे आयोजित २२ व्या पदवीदान समारंभात आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. हे यश त्यांनी आपले संशोधन मार्गदर्शक डॉ. कमल कृष्णा बेरा तसेच शिक्षक स्वप्नील बोकडे, श्याम पाथोडे आणि रजनी चिलबुले यांना समर्पित केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शेतीकरीता नवी डीपीचे तनय देशकर यांचे हस्ते लोकार्पण

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा आणि वारंवार होणाऱ्या वीज समस्येपासून दिलासा मिळावा, यासाठी युवा नेते तनय देशकर यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण केला. चिचगाव येथील शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या नव्या विद्युत डीपीचे उद्घाटन भाजपा युवा मोर्चा चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष तनय देशकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

शेतीसाठी वीज हा शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. वीजपुरवठ्यातील अडथळ्यांमुळे पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. चिचगाव येथील शेतकऱ्यांनी ही समस्या तनय दादा देशकर यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने पाठपुरावा करून महावितरणाकडून अवघ्या ७ दिवसांत नवीन डीपी मंजूर करून घेतली. त्या नंतर जलद गतीने काम पूर्ण करत डीपी चे उद्घाटन संपन्न झाले. आणि युवा नेते तनय दादा देशकर यांनी दिलेला शब्द पाळत त्यांनी डीपी उभारून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळवून दिला.

या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष साकेतजी भानारकर, चिचगावचे उपसरपंच गिरिधरजी ठाकरे, बबनजी राउत, भाजपा बूथ प्रमुख जयपाल ठाकरे, सोशल मीडिया संयोजक धीरजजी पाल, मनोहर ठाकरे, उमेश अलोने, केनया कोरडे, सुनिल अलोने, प्रविन प्रधान आदी शेतकरी उपस्थित होते.

**... QUOTES ...**

“Dreams is not what you see in sleep, is the thing which doesn’t let you sleep.”
- Dr. APJ Abdul Kalam

**चारोळी**

अक्कलदाढ आली आता
मास्तर संस्कार पुरे करा...
आम्ही आमचे बघुन घेऊ,
तुम्ही पगारासाठी संप करा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# प्रा. मंजुषा बजाज यांचे वृक्षारोपणाचे ३७ वे वर्ष



ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे हया वर्षी देखील प्रा. मंजुषा बजाज हयांनी वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजित केला. शारदा कॉलनी, गांधी नगर, हनुमान नगर, कब्रस्तान, वडसा रोड, ग्रामीण रुग्णालय, खेड रोड, कहाली रोड येथे मागील ३६ वर्षापासून त्या वृक्षरोपण करीत आहेत त्यामूळे संपूर्ण परिसर हिरवागार झालेला आहे.

हया वर्षी देखील २४ जुलैला (शुक्रवार) त्यांनी वृक्षरोपणाचा कार्यक्रम गांधीनगर येथे आयोजीत केला. हयाप्रसंगी प्रा. विजय मुडे, प्रा. विनोद नरड, श्री नेताजी मेश्राम संपादक ब्रम्हपुरी ब्लास्ट, प्रा. उमेश मिश्रा, प्रा. सुभाष बजाज, विकास मारबते इ. उपस्थित होते. त्याचप्रमाणे एन.सी.सी. कॅडेट्स एन.एच. महाविदयालयाचे द्रविड तुपट, सुमित कोकोडे, सुरज आठोळे हयांनी उपस्थित राहून वृक्षरोपणाच्या मोलाच्या कामगिरीत सहभाग नोंदविला.

प्रा. बजाज यांनी उपस्थितांचे आभार मानले व गांधीनगर वासियांशी संवाद साधून वृक्षांच्या संवर्धनाची काळजी घेण्याची विनंती केली. मागीत वर्षीपासून हनुमान नगर वासियांच्या विनंतीमुळे तेथे देखील वृक्षरोपण चालू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पोलीस वसाहतीत पण वृक्षरोपण सुरु करण्यात आले आहे.

वडसा रोडच्या रुंदीकरणात हुतात्मा स्मारक समोरील जवळपास ५० झाडे सूचना न देता अत्यंत निर्दयपणे कापण्यात आली यासंबंधी त्यांच्या रोष यावेळेस दिसून आला. विशेष म्हणजे या झाडांना लावलेले तारेचे कुंपन देखील काढून नेले व त्याबाबत कोणीच जवाबदारी घ्यावयास तयार नाहीत. रस्ता बनविणाऱ्यांनी झाडे परत लावावीत, अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

★★★★★★











# जीवघेणा प्रवास आणि अनधिकृत टोलविरोधात...

(पान क्र. १ वरून)

करत ही टोलवसुली पूर्णपणे बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. केसीसी कंत्राटदाराला कडक आणि सक्तीची नोटीस बजावून तात्काळ प्रवासायोग्य व सुरक्षित रस्ता तयार करून देण्यात यावा. जोपर्यंत उड्डाणपुलाचे आणि रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत खरबी नाक्यावरील सर्व वाहनांची टोलवसुली तात्काळ थांबवण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी अविनाश राऊत यांच्यासोबत बळीराम मोहुर्ले, शिवराम माकडे, प्रदिप दोर, महेश भागडकर यांच्यासह नागरिक व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने यावर तात्काळ योग्य पावले उचलली नाहीत, तर जनतेच्या सुरक्षेसाठी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

❀❀❀❀❀❀

# अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी बार फोडले

## तालुक्यातील रूई येथील घटना

ब्रम्हपुरी/का.प्र.

काही दिवसांपूर्वी अड्याळ येथील एक बार चोरट्यांनी फोडले होते. त्याचा तपास सुरू असतानाच रुई या गावातील बार चोरट्यांनी फोडले. देशी-विदेशी दारूचा साठा, एलईडी टीव्ही आणि अकरा हजार रुपये रोख असा एकूण २ लाख १३ हजार २२७ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणाची तक्रार पोलिसांत बारमालकाने केली आहे.

तालुक्यातील रूई येथील अमित दादाजी बनकर यांचे खरकाडा फाट्यावर बार आहे. २५ जुलै रोजी आपाढी एकादशी असल्यामुळे बार दिवसभर बंद होते. रात्री अकरा वाजता अमित बनकर यांनी बाहेरून बारची पाहणी केली. तेव्हा सर्व सुरळीत होते. २६ जुलै रोजी सकाळी सुमारे नऊ वाजता अमित बनकर यांचे भाऊ अतिश बनकर हे बारजवळ गेले. तेव्हा इमारतीच्या मागील बाजूचे दोन्ही शटर अर्धवट उघडे असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. त्यांनी तातडीने बारचे व्यवस्थापक अभिजित टेंभुर्णे आणि अमित बनकर यांना याबाबत माहिती दिली. घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता काऊंटरमधील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी मागील शटर तोडून आत प्रवेश केला. बारमधील देशी विदेशी दारूचा साठा, रोख अकरा हजार रुपये आणि एलईडी टीव्ही असा एकूण २ लाख १३ हजार २२७ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास ठाणेदार प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज खडसे करीत आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.

## सामाजिक उपक्रमांनी सुधीर पंदिलवार यांचा वाढदिवस साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांचे जनसंपर्क कार्यालय प्रमुख सुधीर पंदीलवार यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त बोंडेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, बिस्किटे व चॉकलेटचे वितरण करण्यात आले. तालुका काँग्रेस कार्यालयात केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रसंगी काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# प्रियंका केला आचार्य पदवीने सन्मानित



ब्रम्हपुरी/का.प्र.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या फार्मास्युटिकल सायन्सेस विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवीसाठी संशोधक प्रियंका चित्तरंजन राठी/केला यांचा संशोधन प्रबंध मान्य करण्यात आला असून त्यांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. प्रियंका चित्तरंजन राठी/केला यांनी हे संशोधन कार्य अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी, चिखली येथील संशोधन केंद्रात पूर्ण केले. या संशोधन कार्यासाठी त्यांना प्राचार्य डॉ. कैलास आर. बियाणी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रसंगी डॉ. अविनाश टेकाडे लातूर यांनी बाह्यपरीक्षक म्हणून उपस्थित राहून संशोधन प्रबंधाचे परीक्षण केले. आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल प्रियंका राठी यांचे शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक होत आहे.


Lubi PUMPS-MOTORS | बुधवार बंद | दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar | CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्पिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404